# सायबर सुरक्षेबाबत महाविद्यालयांत जनजागृती

मुंबई : क्वीक हिल फाऊंडेशन आणि मुंबई सायबर पोलिस यांच्यातर्फे 'सायबर सिक्युरिटी' या विषयावर आधारित जनजागृतीपर पथनाट्य उपक्रम मुंबईतील महाविद्यालयांमध्ये सध्या सुरू आहेत. चुकून ओटीपी दुसऱ्याला देणे, सोशल मीडियाचा अतिवापर करणे, लोन ॲप, मेट्रोमोनिअल साईट, कस्टम ड्युटी या नावाखाली होणारी फसवणूक, बोगस लिंक बोगस वेबसाईट फसवे दूरध्वनी या आणि अशा अनेक गोष्टींवर या पथनाट्यांमध्ये भाष्य करण्यात येते. याबाबत विद्यार्थ्यांना जागृत करून आणि अशी फसवणूक झाल्यास काय उपाय करावे हे सांगण्यात येत आहे. या उपक्रमात मुंबईतील ११६ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांशी संवाद साधला जात आहे.